# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 22 April 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २२ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- प्रशासन, पारदर्शकता आणि नवोन्मेष यामध्ये भारत नवीन मापदंड स्थापित करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- महाराष्ट्रात विविध क्षेत्रातल्या कायापालटाचं श्रेय प्रशासकीय अधिकाऱ्यांना- मुख्यमंत्र्यांचे गौरवोद्गार
- जागतिक वसुंधरा दिनानिमित्त आजपासून प्रत्येक गावात जल स्रोत स्वच्छता उपक्रम
- रोमन कॅथोलिक पंथाचे प्रमुख पोप फ्रान्सिस यांचं व्हॅटिकन सिटी इथं निधन, भारत सरकारकडून तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर

आणि

- छत्रपती संभाजीनगर, जालन्यासाठी आज उष्णतेचा यलो अलर्ट, परभणीत तापमान ४३ पार

****

भारत आजच्या काळात केवळ विकासाकरता ओळखला जात नसून, प्रशासन, पारदर्शकता आणि नवोन्मेष यामध्ये नवीन मापदंड स्थापित करत असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. १७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त ते काल नवी दिल्लीत एका विशेष कार्यक्रमात बोलत होते. भारताचा आकांक्षी समाज अभूतपूर्व स्वप्ने आणि महत्त्वाकांक्षा बाळगतो, या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, आपल्याला प्रगतीचा तितकाच अभूतपूर्व वेग आवश्यक असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात झालेल्या कायापालटाचं श्रेय प्रशासकीय अधिकाऱ्यांना असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल मुंबईत राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानाचं पारितोषिरक वितरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवरायांनी घालून दिलेले अनेक नियम आजही कालजयी असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मराठवाड्यातल्या पाणी प्रश्नाचा दूर दृश्यप्रणालीद्वारे आढावा घेतला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं सुरू असलेल्या पाणी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत चर्चा झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मुंबईतल्या नव्या इंटरनॅशनल क्रुझ टर्मिनलवरुन वाहतूक सेवेला काल केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलवाहतूक मंत्री सर्बांनंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. मुंबई पोर्ट ट्रस्टमधल्या व्हिटोरिया डॉकमधल्या नूतनीकरण केलेल्या अग्निशमन स्मारकांच्या लोकार्पणासह इतर काही प्रकल्पांचं लोकार्पण सोनोवाल यांनी यावेळी केलं. दिवसाला १० हजार आणि वर्षाला १० लाख प्रवासी वाहतूक करण्याची या टर्मिनलची क्षमता आहे.

****

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली. यावेळी रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर आणि गजानन निमदेव यांना देखील राज्यपाल राधाकृष्णन यांनी राज्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली.

****

निलंबित प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्याविरुद्ध कोणतीही दंडात्मक कारवाई न करण्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने २१ मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यांच्यावर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत आरक्षणाचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. न्यायालयाने खेडकर यांना दोन मे रोजी चौकशीसाठी दिल्ली पोलिसांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

****

'जागतिक वसुंधरा दिन' आज साजरा होत आहे. यानिमित्त पर्यावरण मंत्रालयाच्या वतीनं पुढचे नऊ दिवस विविध उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे. या अभियानात राज्यातल्या प्रत्येक गावात पाण्याच्या विविध स्त्रोतांची स्वच्छता करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**बाईट – पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे**

दरम्यान, यासंदर्भात माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'दिलखुलास' या आकाशवाणीच्या कार्यक्रमात आज आणि उद्या मुंडे यांची मुलाखत ऐकता येणार आहे.

लातूर जिल्ह्यात आजपासून एक मे पर्यंत 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमात सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

****

रोमन कॅथोलिक पंथाचे प्रमुख पोप फ्रान्सिस यांचं काल व्हॅटिकन सिटी इथं निधन झालं, ते ८८ वर्षांचे होते. गेल्या काही आठवड्यांपासून ते आजारी होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. पोप फ्रान्सिस यांना जगभरातील लोक करुणा, नम्रता आणि आध्यात्मिक धैर्याचे दीपस्तंभ म्हणून नेहमीच लक्षात ठेवतील, अशा शब्दात पंतप्रधानांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल भारत सरकारने आजपासून तीन दिवस शासकीय दुखवटा जाहिर केला आहे.

पोप फ्रान्सिस यांच्या कार्यकाळाचा संक्षिप्त आढावा घेणारा हा वृत्तांत..

***पोप म्हणून निवड झालेली व्यक्ती आजन्म या पदावर राहते. मात्र ११ फेब्रुवारी २०१३ हा दिवस वेगळा सूर्य घेऊन उगवला. तत्कालीन पोप बेनेडिक्ट सोळावे यांनी आपण चालू महिन्याच्या शेवटी पोप पदाचा राजीनामा देत असल्याचं तडकाफडकी जाहीर केलं. व्हॅटिकन सिटीत पोप पदाच्या सहाशे वर्षांच्या इतिहासातला हा पहिलाच राजीनामा. त्यानंतर पुढचा पोप निवडण्याची प्रक्रिया तातडीने सुरू झाली, आणि निवड समितीने होर्हे मारियो बेर्गोलियो यांची २६६ वे पोप म्हणून निवड***

***केली. व्हॅटिकन चर्चचा हा निर्णयही ऐतिहासिक ठरला, कारण पोप पदी निवड होणारे हे पहिलेच अमेरिकी नागरिक होते. १३ मार्च २०१३ रोजी होर्हे मारियो बेर्गोलियो यांनी पोप फ्रान्सिस या नव्या नावासह पोप पदाची सूत्रं स्वीकारली. २०२२ मध्ये त्यांनी कॅनडाला दिलेल्या भेटीत चर्चकडून गेल्या शतकात तिथल्या स्थानिकांवर विशेषत: बालकांवर झालेल्या अनन्वित अत्याचाराबद्दल माफी मागितली, दु:खितांचे कैवारी अशी त्यांची असलेली ओळख यानंतर आणखी दृढ झाली.***

***आकाशवाणी बातम्यांसाठी, हर्षवर्धन दीक्षित, छत्रपती संभाजीनगर***

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात येत्या खरीप हंगामासाठी संरक्षित खतसाठा पुरवठा कालमर्यादेचं पालन करावं, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी नियुक्त पुरवठादार संस्थांना दिले आहेत. जिल्हास्तरीय संरक्षित खत साठा संनियंत्रण समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. यासाठी आठ हजार मेट्रिक टन युरिया तर १५०० मेट्रिक टन डी.ए.पी खताचा साठा मे महिना अखेर उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश स्वामी यांनी दिले.

****

बीड इथल्या सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना–एनसीसीच्या १६ कॅडेट्सची संरक्षण दलाच्या विविध क्षेत्रात निवड झाली आहे. लष्कर, नौदल तसंच निमलष्करी दलासह, महाराष्ट्र पोलीस, महाराष्ट्र होमगार्ड सेवा, या क्षेत्रात या विद्यार्थ्यांची निवड झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, उपाध्यक्ष डॉक्टर योगेश क्षीरसागर, ५१ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सुनील बी. रेड्डी यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

****

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दलामार्फत छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन परिचय प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात आलं. नैसर्गिक आपत्ती दरम्यान करण्यात येणाऱ्या उपाययोजनांविषयी यावेळी माहिती देण्यात आली.

****

राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी काल नांदेड जिल्ह्यातल्या विविध विभागांचा बैठकीतून आढावा घेतला. टंचाई निवारण आणि जलसंधारणाच्या कामाला गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहरातील पाणी टंचाई, वाहतूक, स्वच्छता, रस्ते, यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून आलेल्या तक्रारींवर उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

****

आयुष्यमान भारत मिशन अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात उर्वरित लाभार्थ्यांनी आयुष्यमान कार्ड काढून या योजनेत सहभागी होण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करण्याचं आवाहन समितीचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे यांनी केलं. ते काल जिल्हास्तरीय बैठकीत बोलत होते. जिल्ह्यातल्या ३८ टक्के लाभार्थ्यांनी म्हणजेच १५ लाख २३ हजार लाभार्थ्यांपैकी पाच लाख ७६ हजार जणांनी आयुष्यमान कार्ड काढले असल्याची माहिती शेटे यांनी दिली.

****

लातूर जिल्ह्यातल्या तहसीलदार कार्यालयात २४ आणि २५ एप्रिल रोजी सरपंच पदासाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातल्या ७८५ सरपंच पदासाठी १६० जागा अनुसूचित जातीसाठी, २१ जागा अनुसूचित जमाती, तर मागास प्रवर्गासाठी २११ जागा राखीव असून ३९३ जागांवर सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुल्या असतील. यात ३९४ ठिकाणी महिला सरपंच राहणार आहेत.

****

हवामान

राज्यात काल सर्वाधिक ४४ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमान चंद्रपूर इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक सहा, परभणी इथं ४३ पूर्णांक चार, तर बीड इथं ४२ पूर्णांक तीन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यासाठी आज यलो अलर्ट जाहीर केला आहे, तसंच तुरळक ठिकाणी मध्यम ते हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे.

****